**पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर.**
जिल्हा मुख्यालय, कोळगाव, पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

**प्रेसनोट क्र. ४३ दिनांक १९/०८/२०२४**

# रक्षाबंधन सणाचे औचीत्य साधुन पालघर जिल्हा वाहतुक शाखेकडून हेल्मेट वाटपाचा अनोखा उपक्रम

श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांच्या संकल्पनेतुन जिल्हा नव्याने सुरु झालेल्या वाहतुक शाखेमार्फतीने वाहतुक नियमांचे काटेकोरपणे पालन होणेकरीता वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत.

भारतात रस्ते अपघात ही एक गंभीर समस्या आहे. महाराष्ट्रात देखील ही संख्या सुमारे १४,८०० इतकी आहे. महाराष्ट्रात घडणा-या रस्ते अपघाताचे प्रमाण लक्षात घेता संपुर्ण भारतामध्ये रस्ते अपघातात महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो ही बाब गंभीर असुन केंद्रीय रस्ते व परिवहन मंत्रालय यांनी २०२५ पर्यंत रस्ते अपघातामध्ये मृत्युचे प्रमाण ५० टक्के पर्यंत कमी करण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे.

त्याअनुषंगाने श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे संकल्पनेतुन संपुर्ण पालघर जिल्हयात जनसंवाद अभियान अंर्तगत ‘‘रस्ता सुरक्षा जनजागृती मोहीम’’ राबविण्यात येत असुन रक्षाबंधनासारख्या पवित्र सणाला बहिण भावाला राखी बांधते आणि त्याबद्दल आपली रक्षा करण्याच्या वचनात बांधते. पण भाऊ सुरक्षित असेल तरच तो बहिणीची रक्षा करु शकेल आणि भावाच्या सुरक्षेसाठी त्याचा रोजचा प्रवास सुखाचा होणे तितकेच जरुरीचे आहे. त्यासाठी दुचाकी चालवितांना हेल्मेट आवश्यक आहे. असा मोलाचा संदेश देण्याकरीता दिनांक १९/०८/२०२४ रोजी रक्षाबंधनाचे औचित्य साधुन पालघर पोलीस दलातील महिला पोलीस अंमलदार यांनी विना हेल्मेट दुचाकी स्वारांची ओवाळणी करुन राखी बांधुन भेट म्हणुन हेल्मेट देण्यात येऊन पालघर जिल्हा पोलीस व जिल्हा वाहतुक शाखेकडुन एक अनोखा उपक्रम राबविण्यात आला व हेल्मेटचा नेहमी वापर करावा असे आवाहन करण्यात आले. दिनांक १९/०८/२०२४ रोजी रक्षाबंधनाचे दिवशी पाालघर जिल्हयातील डहाणु, बोईसर, विक्रमगड, घोलवड, मोखाडा या पोलीस ठाण्याचे हद्दीत महत्वाचे चौक याठिकाणी विशेष मोहीम राबवुन महिला पोलीस अंमलदार यांचेकडुन विना हेल्मेट दुचाकी स्वारांची ओवाळणी करुन राखी बांधुन भेट म्हणुन एकुण ६०० हेल्मेट वाटप करण्यात येऊन वाहतुक नियमांबाबत जनजागृती करण्यात आली.

सदरचा कार्यक्रम श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. विनायक नरळे, अपर पोलीस अधीक्षक पालघर, श्रीमती संगिता शिंदे अल्फोन्सो, पोलीस उप अधीक्षक (गृह), पालघर, श्री. विकास नाईक, उप विभागीय पोलीस अधिकारी बोईसर यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/शिरीष पवार, प्रभारी अधिकारी बोईसर पोस्टे, पोनि/प्रदीप पाटील, प्रभारी अधिकारी, डहाणु पोस्टे, श्री. सुरेश साळुंखे, प्रभारी अधिकारी जिल्हा वाहतुक शाखा पालघर, सपोनि/ गजानन पडळकर, प्रभारी अधिकारी घोलवड पोस्टे, सपोनि/प्रेमनाथ ढोले, प्रभारी अधिकारी मोखाडा पोस्टे, सपोनि/रविंद्र पारखे, प्रभारी अधिकारी, विक्रमगड पोस्टे, पोउपनि/संदीप नागरे, मपोहवा/सुरेखा वांगड, मपोशि/सुवर्णा सावंत, पोलीस ठाणेतील महिला पोलीस अंमलदार तसेच पालघर जिल्हा वाहतुक शाखेचे पोलीस अंमलदार यांनी हजर राहुन सदरचा कार्यक्रम उत्कृष्टरित्या राबविला.